माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये
प्राप्त झालेली तक्रार
तक्रार क्रमांक : ११६/२०२३

तक्रारकर्ता, श्री. गोपाळ दौलत उर्फ धोंडबाजी कोठे,

--विरुध्द--

जन माहिती अधिकारी तथा सचिव,
ग्राम पंचायत, पानवाडी, पो. खानगाव ता. काटोल जि. नागपूर

प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्यिकी),
पंचायत समिती काटोल, ता. काटोल जि. नागपूर

तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १९.०६.२०२४

तक्रारकर्ता	:	उपस्थित (ऑनलाईन)
जन माहिती अधिकारी	:	उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी	:	उपस्थित

द्वितीय अपील आदेशाचा दिनांक	आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक	मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक
२७.०३.२०२३	---	२५.०४.२०२३

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) नुसार व्दितीय अपील क्र. ३१९८/२०२२, दिनांक २७.०३.२०२३ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

सदर तक्रारीवर दिनांक १९.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता ऑनलाईन उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, पानवाडी पो. खानगाव ता. काटोल जि. नागपूर श्री. राजू सडमाके ऑनलाईन उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्यिकी) पंचायत समिती काटोल ता. काटोल जि. नागपूर श्री. माने ऑनलाईन उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय (अपील क्र. ३१९८/२०२२) मध्ये दिनांक २७.०३.२०२३ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले आहेत.

" अपीलार्थी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी पुढील ४८ तासात ग्रामपंचायत पानवाडी येथील अभिलेखाचे संयुक्तीक निरीक्षण करुन उपलब्ध असलेल्या माहितीची खातरजमा करुन घ्यावी. यानंतरही माहिती आढळून न आल्यास साधारणत: मालमत्तेच्या नोंदी ज्या ज्या प्राधिकरणाकडे करण्यात येतात, म्हणजेच महसूल प्राधिकरण, भूमी अभिलेख, पाणी पूरवठा विभाग व इतर संबंधित यंत्रणेकडे माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ६(३) नूसार अपीलार्थी यांचे जोडपत्र – अ हस्तांतरीत करुन त्यांचेकडे माहिती उपलब्ध असल्यास त्यांचेकडून माहिती प्राप्त करुन अपिलार्थीस विनामुल्य देण्यात यावी. तसेच वरील प्रकरणात मागितलेली कागदपत्रे जीणीवपूर्वक गहाळ केली असल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नूसार फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल, ही बाब विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी लक्षात ठेवावी, . " या निर्देशासह व्दितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर व्दितीय अपीलावरील आदेशास अनुसारून तक्रारकर्ता यांनी दि. २५.०४.२०२३ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली . सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलार्थी यांनी व्दितीय अपील क्र. ३१९८/२०२२ मध्ये दि. २७.०३.२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अपिलार्थी, श्री. गोपाळ कोठे यांनी दाखल केलेल्या अपील अर्जावर त्यांचे वडिल दौलत उर्फ धोंडबाजी कोठे यांच्या वडिलोपार्जित जुने घराचा मालकी हक्क मिळण्याकरिता नमुना ८ ची सत्यप्रत व ७/१२ ची सत्यप्रत मागितली असून उपरोक्त माहिती ही सन १९७२-७३ व १९७३-७४ या वर्षांशी संबंधित आहे. त्याबाबतीत विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच सर्व प्राधिकरणांनी अभिलेखाचे संयुक्तिक निरीक्षण करून उपलब्ध असलेल्या माहितीचे खातरजमा करण्याविषयी निर्देश देण्यात आले होते. तसेच साधारणत: मालमत्तेच्या नोंदी ज्या ज्या प्राधिकरणाकडे करण्यात येतात त्या सर्वांकडून म्हणजेच महसूल, भूमी अभिलेख, पाणी पुरवठा व इतर संबंधित यंत्रणांकडे माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जोडपत्र अ हस्तांतरित होऊन त्यांच्याकडील माहिती उपलब्ध असल्यास ती प्राप्त करून विनामुल्य देण्याचे व मागितलेली माहिती गहाळ केली असल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ मधील कलम ९ नुसार कार्यवाही करण्यात येईल या ताकीदीसह निकाली काढण्यात आला होता.

त्यावर अपिलार्थी, श्री. कोठे यांच्या वतीने दि. २५.०४.२०२३ रोजी तक्रार अर्ज दाखल करण्यात आला व दि. १६.०६.२०२३ रोजी सुनावणी सूचना व अंमलबजावणीबाबत अहवाल सादर करण्याचे निर्देश जारी करण्यात आले. त्याअनुषंगाने ग्राम पंचायत, पानवाडी यांच्यावतीने सविस्तर अहवाल सादर करण्यात आला असून यात प्राधिकरणाने वरील आदेशाच्या अनुषंगाने महसूल प्राधिकरण, उप अधिक्षक, भूमी अभिलेख व ग्रामीण पाणी पुरवठा विभागास अर्ज हस्तांतरित केला असून ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व उप अधिक्षक, भूमी अभिलेख यांनी त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. तसेच महसूल प्राधिकरणाने काहीही कळविले नाही.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★ नागपूर ★

तसेच ग्राम पंचायत येथील अभिलेखाची पुनश्च: तपासणी केली असता अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या वडिलोपार्जित घराचा नमुना ८ रजिस्टर सापडले नाही. परंतु तपासणी करताना घर कर मागणी नमुना — ९ चे सन १९७४-७५ च्या रजिस्टर मध्ये अपिलार्थी यांचे वडिल श्री. धोंडबा हरबा कोठे यांच्या नावाची नोंद आढळून आलेली आहे. व सन १९७५-७६ मध्ये श्री. धोंडबा हरबा कोठे यांचे नावाजवळ निळकंठ धोंडबा मुलाचे नाव असे रजिस्टर मध्ये नमूद केलेले आहे. त्या सन १९७४-७५ व सन १९७५-७६ च्या रजिस्टर मधील त्यांच्या नावांची नोंद असलेली पानाची छायांकित प्रत सादर करण्यात आली असून त्याची एक प्रत अपिलार्थीस देखील देण्यात आलेली आहे.

उक्त प्रकरणी महसूल प्राधिकरणाने काहीही कळविले नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, संबंधित महसूल प्राधिकरण यांचेकडून त्यांच्या कार्यालयीन अभिलेखात अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ च्या अनुषंगाने अपिलार्थी यांचे वडिल श्री. धोंडबा हरबा कोठे यांच्या नावाची नोंद नाही.

सन १९७२-७३, सन १९७३-७४ व सन १९७४-७५ इत्यादी कालावधीतील मौजा हरणखुरी येथील घराबाबत नोंद उपलब्ध असल्यास ती प्राप्त करून अपिलार्थीस प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १९.०६.२०२४

जा.क्र. 7179 --दि.----------

04 OCT 2024